Head Office : Level 8, Muttha Chambers II, Senapati Bapat Marg, Pune 411016
Tel.: 020-6605 0000 Fax: 020-6605 0191
Website: www.bjsindia.org E mail: info@bjsindia.org
Facebook: www.facebook.com/BJSIndia

BJS
Bharatiya Jain Sangathan

## मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या २०० मुला-मुलींना बीजेएसने शिक्षणासाठी पुण्यामध्ये आणले

भारतीय जैन संघटनेने (बीजेएस) मागील महिन्यात बीड, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या ४३४ कुटुंबांचे सर्वेक्षण करून १२० मुला-मुलींना पुणे येथे शैक्षणिक पुनर्वसनासाठी आणले आहे. आज औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली व नांदेड या उर्वरित ५ जिल्ह्यातून ३५० परिवारांचे सर्वेक्षण करून ८० मुला-मुलींना पुणे येथे आणले आहे. अशा पद्धतीने दोन टप्प्यात संपूर्ण मराठवाड्याचा अंतर्भाव करण्यात आला असून या विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणासाठी एक भरीव व ठोस कार्यक्रमाची सुरुवात झाली आहे. याद्वारे बीजेएसने संपूर्ण मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आहे.

या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे शालेय शिक्षण सुरु केले आहे. त्यांना शालेय शिक्षणाबरोबरच योग्य आहार, आरोग्य, मैदानी खेळ, कला, संस्कृती, संगणक प्रशिक्षण इत्यादी सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. बीजेएसच्या वतीने त्यांच्यासाठी खास मानसोपचारतज्ज्ञ व मेंटल हेल्थ डिपार्टमेंट सुरु करण्यात आले असून डॉ. किंजल गोयल यांची या विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या विभागा मार्फत या सर्व मुलांच्या मानसिकतेवर होणा-या परिणामांची नोंद घेण्यात येणार आहे. अशाप्रकारे हा प्रकल्प योग्यरीतीने हाताळण्याचा प्रयत्न बीजेएस करणार आहे. काल १ डिसेंबर रोजी औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली व नांदेड या प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी निरोप समारंभाचे आयोजन करून या विद्यार्थ्यांना रवाना करण्यात आले आहे. आज या विद्यार्थ्यांचे बीजेएसच्या पुणे येथील वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पात आगमन झाले आहे. या ठिकाणी कोणत्याही औपचारिक कार्यक्रमाचे आयोजन न करता हे विद्यार्थी आपल्या दैनंदिन कामाला लागले आहे.

प्रति, दिनांक : ०२.१२.२०१५
मा. संपादक

सप्रेम नमस्कार,

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावी हि विनंती.

कळावे.

आपला स्नेहांकित,

Smuttha

शांतीलाल मुथ्था
संस्थापक, बीजेएस